# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### विज्ञान विभाग

लोकमत पुणे, गुरुवार, दि. ४ ऑक्टोबर २०१८ ४

## राजगुरु महाविद्यालयात २०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये रक्तगट, रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, इलेक्ट्रो कार्डिओग्राम (ईसीजी) यासह विद्यार्थ्यांची उंची, वजनाची तपासणी करण्यात आली. या शिबिरात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या तपासण्या करून घेतल्या. शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संचालक कोंडीभाऊ टाकळकर, डॉ. सुधीर भालेराव, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना संचालक बाळासाहेब सांडभोर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी व्यायामाला जीवनाचा अविभाज्य घटक बनविला पाहिजे. व्यसनांपासून लांब राहताना शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती राखण्यासाठी पौष्टिक आहार आणि उपयुक्त व्यायामाकडे लक्ष द्यायला हवे. व्यायामशाळा ही आधुनिक देवळे असून, व्यायामासारखे सुंदर औषध नाही असे ते म्हणाले.



राजगुरु महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना बाळासाहेब सांडभोर.

डॉ. सुधीर भालेराव यांनी डेंग्यू, कावीळ, एड्स, हृदयविकार अशा विविध आजारांची माहिती सांगून त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तपासण्यांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. या शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी या आरोग्य तपासण्यांची नेमकी माहिती व प्रमाण सांगणारे पोस्टर तयार केले. या सर्व तपासण्या पूजा पाटील, शारदा बुरुड, रेश्मा डवणे, स्नेहा पवळे, प्रतीक्षा पवळे, वैष्णवी खेडकर, प्रणव वारणे, ऋषिकेश खोलगडे, संकेत ढोरे या विद्यार्थ्यांनी केल्या. त्यांना डॉ. सुधीर भालेराव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. विकास देशमुख, प्रा. रुपाली वापाळ व प्रयोगशाळा परिचर मुरलीधर सांडभोर, प्रयोगशाळा सहायक दिगंबर नांगरे यांनी केले.

प्रभात पुणे, गुरुवार, दि. ४ ऑक्टोबर २०१८



राजगुरुनगर : महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिरात विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करताना डॉक्टर.

# राजगुरू महाविद्यालयात आरोग्यविषयक जनजागृती

**राजगुरुनगर** - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तगट, रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, इलेक्ट्रो कार्डीओग्राम (इसीजी) यासह विद्यार्थ्यांची उंची, वजनाची तपासणी करण्यात आली. या शिबिरात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी वैविध प्रकारच्या तपासण्या करून घेतल्या.या शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक कोंडीभाऊ टाकळकर, डॉ. सुधीर भालेराव, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी या आरोग्य तपासण्यांची नेमकी माहिती व प्रमाण सांगणारे पोस्टर तयार केले. या सर्व तपासण्या पूजा पाटील, शारदा बुरुड, रेश्मा डवणे, स्नेहा पवळे, प्रतीक्षा पवळे, वैष्णवी खेडकर, प्रणव बारणे, ऋषिकेश खोलगडे, संकेत ढोरे या विद्यार्थ्यांनी केल्या. त्यांना डॉ. सुधीर भालेराव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. विकास देशमुख, प्रा. रुपाली वायाळ व प्रयोगशाळा परिचर मुरलीधर सांडभोर, प्रयोगशाळा सहायक दिगंबर नांगरे यांनी केले.

पुढारी
पुणे, शुक्रवार
५ ऑक्टोबर २०१८

# राजगुरू महाविद्यालयात आरोग्य शिबिर

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये रक्तगट, रक्तदाब, शरीरातील चरबी, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, इलेक्ट्रो कार्डिओग्राम (ईसीजी) यासह उंची, वजनाची तपासणी करण्यात आली. यात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी विविध तपासण्या करून घेतल्या. या शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. संचालक कोंडीभाऊ टाकळकर, डॉ. सुधीर भालेराव, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. डॉ. सुधीर भालेराव यांनी डेंग्यू, कावीळ, एड्स, हृदयविकार अशा विविध आजारांची माहिती दिली. सर्व तपासण्या पूजा पाटील, शारदा बुरुड, रेश्मा डवणे, स्नेहा पवळे, प्रतीक्षा पवळे, वैष्णवी खेडकर, प्रणव बारणे, ऋषिकेश खोलगडे, संकेत ढोरे या विद्यार्थ्यांनी केल्या. त्यांना डॉ. सुधीर भालेराव यांनी मार्गदर्शन केले. याचे आयोजन विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. विकास देशमुख, प्रा. रुपाली वायाळ व प्रयोगशाळा परिचर मुरलीधर सांडभोर, प्रयोगशाळा सहायक दिगंबर नांगरे यांनी केले.

केसरी पुणे, ६ ऑक्टोबर २०१८

# राजगुरू महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



राजगुरुनगर, (वार्ताहर) .: येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तगट, रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, इलेक्ट्रो कार्डीओग्राम (इसीजी) यासह विद्यार्थ्यांची उंची, वजनाची तपासणी करण्यात आली. या शिबिरात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या तपासण्या करून घेतल्या.

शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. यावेळी संचालक बाळासाहेब सांडभोर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी व्यायामाला जीवनाचा अविभाज्य या कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. विकास देशमुख, प्रा. रूपाली वायाळ व प्रयोगशाळा परिचर मुरलीधर सांडभोर, प्रयोगशाळा सहायक दिगंबर नांगरे यांनी केले.

जनप्रवास ५
गुरुवार, दि. ०४ ऑक्टोबर २०१८

# राजगुरू महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**राजगुरूनगर । वार्ताहर**

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तगट, रक्तदाब, शरीरातील चरबीचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, इलेक्ट्रो कार्डीओग्राम (इसीजी) यासह विद्यार्थ्यांची उंची, वजनाची तपासणी करण्यात आली. या शिबिरात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या तपासण्या करून घेतल्या.



शिबिराचे उदघाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सांडभोर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. उदघाटन प्रसंगी बोलताना संचालक बाळासाहेब सांडभोर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी व्यायामाला जीवनाचा अविभाज्य घटक बनविला पाहिजे. व्यसनांपासून लांब राहताना शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती राखण्यासाठी पौष्टिक आहार आणि उपयुक्त व्यायामाकडे लक्ष द्यायला हवे. व्यायामशाळा ही आधुनिक देवळे असून व्यायामासारखे सुंदर औषध नाही असे ते म्हणाले. या शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आरोग्य तपासण्यांची नेमकी माहिती व प्रमाण सांगणारे पोस्टर तयार केले. या सर्व तपासण्या पूजा पाटील, शारदा बुरूड, रेश्मा डवणे, स्नेहा पवळे, प्रतीक्षा पवळे, वैष्णवी खेडकर, प्रणव बारणे, ऋषिकेश खोलगडे, संकेत ढोरे या विद्यार्थ्यांनी केल्या.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख